# काट्याच्या अणिवर

हॉटेलच्या चौथ्या मजल्यावरच्या खिडकीतून विकास खिन्न मनाने बाहेर पाहत होता. तिथून अबूधाबीचा मानबिंदू असलेला 'कॉर्निश' आणि पलीकडचा भारताचा वेध लावणारा अरबी समुद्र दिसत होता. गेल्या १९-२० महिन्यांत खरं म्हणजे अगदी अबूधाबीला आल्यापासून ही खिडकी म्हणजे त्याचं एक दिलासा मिळवण्याचं स्थान झालं होतं. तो या जागेला 'बॅटरी चार्जर' म्हणायचा.

कॉर्निश म्हणजे जमिनीची मर्यादा संपते तिथे कडेकडेने बांधलेला रस्ता! अबूधाबीच्या या कॉर्निशभोवती मन प्रसन्न करणारी सुंदर बाग आहे. वाळूच्या तेलाच्या पैशावर अक्षरशः पाण्यासारखा पैसा खर्च करून अबूधाबीच्या शेख झायेदने इथे मरूभूमीचे नंदनवन केले होते. त्यासाठी समुद्राच्या पाण्याचं परिवर्तन करून त्यालाही गोड व्हायला भाग पाडलं होतं. त्यामागचे भगीरथ प्रयत्न पाहिले की कोणालाही पुढे जाण्याची प्रेरणा मिळावी. प्रयत्ने वाळूचे कण रगडता.... याचा हा दुसरा अंक! पण आज मात्र विकासला तो कॉर्निश स्फूर्ती देत नव्हता. ह्या कॉर्निशच्या कट्ट्याशी स्टेफनी उभी होती. त्याची स्टेफनी! दोघांचंही आयुष्य आज एका सीमारेषेवर अवगंठून उभं होतं.

स्टेफनीच्या पहिल्या भेटीपासूनचे सर्व प्रसंग त्याच्या नजरेसमोरून तरळून गेले. विदर्भातल्या एका छोट्या गावातून तो इथे आला होता. अभयारण्याजवळील एका हॉटेलमध्ये काम करताना तिथल्या एका पाव्हण्याने विकासची 'मॅनेजमेंट' पॉवर हेरली आणि त्याला अबूधाबीच्या पंचतारांकित हॉटेलचा फ्लोअर मॅनेजर म्हणून नोकरीची संधी दिली. डोळे विस्फारावे इतका मोठा पगार, तीन वर्षाचा कॉण्ट्रक्ट! विकासनं एकूण हिशेब काढला. तीन वर्षात त्याला भावाचं शिक्षण, बहिणीचं लग्न, स्वतःसाठी घर एव्हढं सगळं करता येण्यासारखं होतं. म्हणून त्यानं ते आव्हान स्वीकारलं.

हॉटेलमधल्या कामाच्या पहिल्या दिवशी हॉटेलच्या मॅनेजरने त्याला संपूर्ण हॉटेलची टूर दिली. संगमरवरी पायघड्या घातल्यासारखे व्हरांडे आणि राजेशाही संगमरवरी खांबांच्या रांगोळ्यांमधून चालताना एकीकडे त्याचा मॅनेजर अबूधाबीची इतर माहिती देत होता - "इतर मुस्लिम देशांच्या मानाने युनायटेड अरबी एमरिटस्चे सात प्रदेश

पुरोगामी विचारांचे आहेत. अबूधाबीत मुलींना शिक्षणाला सवलती आहेत, नोकरी करायला परवानगी आहे. इथे फक्त १५ टक्के लोक मूळचे नागरिक आहेत. बाकी सर्व नोकरीनिमित्त आलेले. हे मूळचे शेख एकमेकांशी कुठल्या ना कुठल्या नात्याने जुळलेलेच असतात. तेव्हा कुणीही शेख-शेखा दिसले तरी त्यांना सत्ताधाऱ्यांसारखाच मान द्यावा. इथे स्त्रीपुरुष संबंधांचे कायदे खूप कडक आहेत..." बोलत बोलत ते स्विमिंगपूलच्या भागात आले. तलावाच्या बाजूला काही परदेशी पाव्हणे एक किंवा दोन तुकड्यांच्या कपड्यांमध्ये पहुडले होते. त्याच्याशी विरोधाभास वाटावा अशी एक बाई चक्क संपूर्ण बुरखा घालून बसली होती. तिच्याजवळ ४-५ वर्षांचा एक मुलगा खेळत होता. दोन्ही हात फैलावून विमान-विमान करत तलावाच्या बाजूच्या ओल्या फरशीवर धावत होता.

" हा बहुतेक पाण्यात पडणार!" विकासच्या मनात आलं. जवळच्या खोलीतून टॉवेल्स रचलेली हातगाडी घेऊन एक तरुणी येत होती. तो मुलगा त्या हातगाडीवर धडकला आणि पाण्यात पडला. गाडीमागची तरुणी जोरात किंचाळली. सर्वांचं लक्ष तिच्याकडे गेलं. विकासचं लक्ष ह्या मुलाकडे होतं म्हणून तो पाण्यात पडल्याचं विकासच्या चटकन् लक्षात आलं. त्यानं पाण्यात उडी मारून मुलाला बाहेर काढलं. मॅनेजर त्याच्या प्रसंगावधानावर खूश झाला. विकासनं त्या मुलाच्या नाकातोंडात पाणी गेलेलं काढलं. टॉवेलवाली मुलगी थरथर कापत उभी होती. तिने पुढे केलेल्या टॉवेलमध्ये विकासनं त्या मुलाला गुंडाळलं. तेव्हां बुरखेवालीनं हात पुढे केला. विकासनं मुलाला तिच्या स्वाधीन केलं. बुरखेवाली थोडी बाजूला झाल्यावर मॅनेजरने निःश्वास टाकला.

"माशल्ला! अल्लाच्या कृपेने आपण सगळेच वाचलो. शेखच्या मुलाला काही झालं असतं तर आज आपली धडगत नव्हती." तो म्हणाला. "स्टेफनी, विकासला टॉवेल दे. त्याच्या कपड्यांची मी व्यवस्था करतो. तोपर्यंत त्याला तुझ्या ऑफिसमध्ये बसू दे." म्हणून तो तिथून निघाला. विकासच्या आत्ता लक्षात आलं, आपला पहिल्यांदाच घातलेला नवाकोरा सूट चिंब ओला झाला आहे. स्टेफनीनं टॉवेल पुढे केला. दोघांची नजरानजर झाली. त्याच्या प्रसंगावधानावर ती भाळली होती. विकास तिच्याकडे पाहत होता. तिचे तिरपे पण मोठे काळेभोर डोळे पाण्यानं डबडबलेले होते. भावपूर्ण डोळे, खोबरेल तेलाच्या जाहिरातीत असतात तसे काळे चमकदार केस आणि नितळ चेहरा! विकास बघतच राहिला. भारतात आपण ज्यांची 'चिंकु चिंकु म्हणून टिंगल करायचो त्या मुलीही इतक्या सुंदर असू शकतात याचं त्याला आश्चर्य वाटलं. पहिल्या भेटीतच दोघांचाही फज्जा उडाला होता.

ती दोघं स्टेफनीच्या ऑफिसमध्ये गेली. स्टेफनीला तेव्हढ्यात फोन आला. तिचा फोन आटोपल्यावर त्याने विचारलं, "तू चिनी भाषेत बोलत होतीस का?" स्टेफनी हसली आणि म्हणाली, "तुम्ही सगळे भारतीय तमाम आशिआई लोकांना चिनी का समजता? मी फिलिपिन्सची आहे."

विकास चेहरा पाडत म्हणाला, "कसं ओळखायचं? आम्हाला सगळे सारखेच वाटतात."

त्याचा भाबडेपणा तिला आवडला.

"सोपं आहे. आमच्या फिलिपिनो भाषेत एक कवीनं डोळ्यांना सूर्यफुलाची उपमा दिली आहे. पृथ्वीचा गोल डोळ्यापुढे आण. जसंजसं तुम्ही विषुवृत्ताकडे सरकता तसतसे मंगोलियन लोकांचे डोळे मोठेमोठे होत जातात असं माझं निरीक्षण आहे," असं ती म्हणाली तेव्हां त्याला खूप गंमत वाटली. पुढच्या सहा महिन्यात विकास तिच्याकडून खूप शिकला आणि ती विकासकडून! दोघं प्रेमात पडली होती, पण सांभाळून राहत होती. अबूधाबीच्या नियमांप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी प्रेमाचं प्रदर्शन पूर्णपणे टाळत होती.

अबूधाबीत त्याचा जम बसला होता. नियमितपणे पैसे घरी पाठवत होता. बहिणीचं लग्न उरकल्यावर आईने त्याच्या लग्नाचा विषय काढला तेव्हा त्यानं सरळसरळ स्टेफनीबद्दल सांगून टाकलं. "तिला भारतात घेऊन ये. आपण लग्नाचं ठरवू" - आई म्हणाली. आपल्या कर्तबगार मुलाचं मन मोडणं तिला जमणार नव्हतं. पण विकासने अजून स्टेफनीलाच लग्नाचं विचारलेलं नव्हतं.

डिसेंबरमध्ये हॉटेलमध्ये प्रवाशांची गर्दी वाढली. हॉटेलतर्फे काढण्यात येणाऱ्या 'सॅण्ड ड्यून्स'च्या टूरसाठी एस्कॉर्ट कमी पडू लागले. सॅण्ड ड्यून्स म्हणजे चक्क वाळूचे ढीग! ते पाहायला लोक पैसे खर्च करून का जातात याचं विकासला नेहमी कोडं असायचं. एकदा त्याला एस्कॉर्ट म्हणून जायची संधी मिळाली. पण त्या सहलीचं आणखी एक आकर्षण म्हणजे स्टेफनीलाही एस्कॉर्ट म्हणून पाठवण्यात आलं होतं. तिच्या सहवासात पूर्ण दिवस घालवायचा हा आकर्षणाचा भाग होता.

सहलीसाठी खास नेमलेल्या एस यू व्ही मधून ते अल खाटेमला पोहोचले. अबूधाबीपासून जेमतेम ४५ मिनिटांचा प्रवास! अल खाटेमला वाळवंट लागल्याबरोबर गाड्या मुख्य रस्ता सोडून वाळूच्या डोंगरावर चढल्या. वरती गेल्यावर गाड्या थांबल्या. ह्या गाड्यांच्या चाकांमधली हवा काढण्यात आली आणि रोलरकोस्टरसारख्या ह्या गाड्या हिंदकळत वाळूमधून खाली घसरत गेल्या. प्रवाशांनी मोठ्याने ओरडून, किंचाळून आनंद व्यक्त केला. वातावरणात चैतन्य पसरलं.

डोंगर उतरून सपाट जागी पोहोचल्यावर तिथे 'अबूधाबी सांस्कृतिक दर्शन' होतं. मध्यभागी एक चौथरा, त्याच्या चारी बाजूला पारंपारिक तंबू. तंबूंच्या भोवती उंटांच्या सफारीसाठी सजवलेले उंट! प्रवाशांना घालून पाहण्यासाठी पारंपारिक पोशाख ठेवलेले होते. एकीकडे शाही जेवणासाठी बकरीचं मांस शिजत होतं. विकासनं आजूबाजूला पाहिलं. सूर्यप्रकाशाने चमकणाऱ्या वाळूच्या चांदण्यांची चादर चारी बाजूला पसरली होती. माणसाच्या वस्तीचा कुठे मागमूसही नव्हता ह्या वाळूच्या डोंगरांच्या मध्यभागी! सगळीकडे वाळूच वाळू! एखाद्या मुगल सुंदरीच्या चेहऱ्यावरील पडद्यासारखी तलम मुलायम वाळू! आणि तिच्या चेहऱ्यावरील भाव बदलावेत तितक्या सहजपणे वाऱ्याच्या प्रत्येक झुळुकीबरोबर वाळूच्या डोंगरावरील रांगोळी बदलत होती. निसर्गाच्या त्या कॅलीडोस्कोपकडे विकास डोळे विस्फारून पाहत होता. प्रवाशांची व्यवस्था लावून स्टेफनीही त्याच्याजवळ येऊन उभी राहिली.

"ए, आपण त्या डोंगरावर जाऊन सूर्यास्त बघू या का?" त्यानं विचारलं. ती दोघं चढण चढून गेली. निरभ्र आकाशातून हळूहळू पुढे सरकणारा सूर्य डोंगराला टेकला. त्या अलगद स्पर्शाने रोमांचित होऊन संपूर्ण टेकडी लालबुंद झाली. वाळूच्या प्रत्येक कणातील स्फुल्लिंग पेटून उठलं होतं त्या अनोख्या तेजाने. विकासनं स्टेफनीचा हात हातात घेत विचारलं, "माझ्याशी लग्न करशील?" स्टेफनीला त्याला घट्ट मिठी माराविशी वाटली. पण तिथल्या नियमांच्या भाराखाली अवघडलेल्या स्टेफनीनं फक्त भावपूर्ण डोळ्यांनीच होकार दिला. दोघांची भावसमाधी उतरली तेव्हां पौर्णिमेचा चंद्र वर आला होता. चांदणं ल्यालेले वाळूचे डोंगर आता हिमकणांसारखे चमकत होते. स्टेफनी-विकासच्या मनात लक्ष लक्ष चांदण्यांचे दीप उजळले होते.

थोडेच दिवस भारतात जाऊन ती दोघं लग्न करून आली. आल्यावर रजिस्ट्रेशनसाठी म्हणून सरकारी कचेरीत गेली. तिथल्या अधिकाऱ्यांनी सगळे कागदपत्र पाहिले आणि सांगितलं, "विकासला जेवढे पैसे मिळतात तेव्हढ्या पैशात सरकारी नियमांप्रमाणे संसार चालू शकत नाही. त्याला आणखी पाच हजार दिराम वर्षाला मिळाल्याशिवाय त्यांना लग्न रजिस्टर करता येणार नाही." थोडक्यात अबूधाबीच्या नियमांप्रमाणे सरकारने त्यांचं लग्न अवैध ठरवलं होतं. म्हणजे त्यांना पतिपत्नी म्हणून एकत्र राहता येणार नव्हतं. विवाहबाह्य संबंध ठेवणाऱ्यांना या देशात कठोर शिक्षा करण्यात येते. वाळूच्या वादळांमध्ये वाळूच्या टेकड्यांचं अस्तित्त्वच नाहीसं व्हावं तसं स्टेफनी विकासचं आयुष्य एका फतव्याने बदललं होतं.

दोघंही खूप गोंधळले. स्टेफनीनं तिच्या चर्चमध्ये, तर विकासनं त्याच्या मित्रांना विचारून पाहिलं. मुस्लिम देशात कायद्याचा विषय निघाला की सगळेच कचरतात.

शेवटी त्यांनी एका भारतीय वकिलाचा सल्ला घ्यायचं ठरवलं. वकिलाने सांगितलं, "अबूधाबीत कायदे कडक आहेत. शिक्षा ठरवली की ते तुमची प्रतिष्ठा वगैरे काही पाहत नाहीत. एकदा एका शेखच्या बायकोकडे बाळंतपणात दुर्लक्ष केल्याच्या आरोपावरून एका मराठी गायनेकोलॉजिस्टला तीन वर्षे तुरुंगात डांबलं होतं. कायद्यांमध्येही व्यभिचाराचे कायदे आणखीनच कडक आहेत. १९९५ मध्ये व्यभिचाराबद्दल एका परदेशी बाईला दगडाने ठेचून मारण्याची शिक्षा ठोठावण्यात आली होती. तिच्या देशाने 'ती गरोदर आहे, तिची शिक्षा कमी करावी' असा अर्ज केला तेव्हा तिची शिक्षा ९ महिने कारावास आणि १०० चाबकाचे फटके एव्हढी कमी करण्यात आली. २००० साली इंडोनेशियाच्या एका बाईला असंच विवाहबाह्य संबंधासाठी तुरुंगात टाकलं होतं. ती अल् आयेबाच्या तुरुंगात होती. हा तुरुंग तिथल्या छळवादासाठी प्रसिद्ध आहे. इंडोनेशियाच्या वकालतीने तिच्यासाठी अर्ज करण्याआधीच तिथल्या अधिकाऱ्यांनी तिला दगडाने ठेचून मारलं."

वकिलाचं वक्तव्य ऐकून स्टेफनी बेशुद्ध पडली. कारण ती तीन महिन्यांची प्रेग्नंट होती. भीतीची एक कळ विकासच्या पाठीतून सळसळत गेली. पाठच्या पाच भावंडांच्या शिक्षणासाठी स्टेफनीला नोकरी करणं भाग होतं. शिवाय कॉण्ट्रॅक्ट तोडायचं म्हणजेही संकटच! म्हणजे आणखी दीड वर्ष तरी विकासला आणि तिला वेगळं राहायला हवं होतं. खूप विचार करून दोघांनी ठरवलं - पहिली गोष्ट दोघांनी लगेच वेगळं राहायचं, स्टेफनीनं काही महिने फिलिपिन्समध्ये जायचं. बाळ झाल्यावर ते तिच्या आईकडे ठेवून परत यायचं. तोपर्यंत एका हॉटेलमधे राहूनही सहप्रवाशांसारखं राहायचं!

बाळाला फिलिपिन्समध्ये ठेवून स्टेफनी परत आली. स्विमिंगपूलजवळ छोटी मुलं पाहिली की शब्दशः तिचा ऊर भरून यायचा. एकदा एक अमेरिकन बाई म्हणाली, "माझं बाळ केव्हाचं तुझ्याचकडे बघतंय! धरतेस का त्याला?"

स्टेफनीला भावनावेग आवरेना. ती मानेनंच नको म्हणत असताना त्या बाईने ते मूल तिच्या हातात सोपवलं. बाळाला घेतल्याबरोबर स्टेफनीला खूप पान्हा फुटला. हातापर्यंत कळ लागली त्या दाबाने. तिनं कसंबसं ते मूल परत दिलं अन् छातीशी टॉवेल दाबून ती बाथरूमकडे पळाली. आरश्यात स्वतःच्या ओल्या ब्लाउजकडे पाहताना ओक्साबोक्शी रडू लागली. पण काही मिनिटंच! तेव्हढ्यात तिला मागे कोणाची तरी चाहूल लागली. तशी ती तिथून निसटली आणि टॉवेलरूममध्ये जाऊन तिने आपल्या भावनांना वाट करून दिली.

'हे कसलं आयुष्य! नवरा जवळ असून नसल्यासारखा! मूल हजारो मैल

दूर! का करतोय आपण हे सगळं?' ती मनाशीच उद्वेगत होती. तेव्हढ्यात तिची सुपरवायझर घाबरत घाबरत तिथे आली.

"स्टेफनी! त्यांना कळलं!" ती...

"कोणाला? आणि काय?" स्टेफनीनं चिडून विचारलं.

"शेखा सलमाला तुझ्याबद्दल कळलं! त्यांनी तुला बाथरूममध्ये पाहिलं. मग मला विचारलं. मला त्यांना सगळं सांगावं लागलं." ती अपराधी स्वरात म्हणाली. स्टेफनीच्या अंगातलं त्राण संपलं! ती निर्विकार झाली. सरड्याची धाव संपली होती. खिन्न मनाने ती कॉर्निशकडे चालू लागली. मनातली वादळं शमावायला ती नेहमीच तिथे जात असे. पण आज मात्र तिच्या डोळ्यापुढे तुरुंगातल्या भयकथाच थैमान घालीत होत्या. चाबकाचे फटके खाणाऱ्या, दगडफेक झेलणाऱ्या 'व्यभिचारी' बायका? 'विवाहबाह्य संबंधा'चा एक नवा अर्थ तिला कळला होता. वैध काय किंवा अवैध काय? आंधळ्या न्यादेवतेच्या हातातल्या काट्याच्या अणीवर तीन देशांचे कायदे तोलले जात होते. आणि तीन जीवही! तुरुंगात जाण्याऐवजी समुद्रात उडी मारावी असं तिला वाटत होतं. पण मनाचे सगळे धागे त्या समुद्राच्या पलीकडे दूरवर असणाऱ्या तिच्या तान्हुल्यामध्ये गुंतलेले होते. ती मनाशीच विचार करीत होती, 'तुरुंगात जाईन, पण दगड वगैरे मारायला लागले तर गळफास लावून घेईन.' तिचा हात नकळत गळ्याकडे गेला. गळ्यातला क्रॉस तिने ओठावर गच्च दाबून ठेवला. बाल येशू ख्रिस्ताला कडेवर घेऊन उभ्या असणाऱ्या मेरीची प्रतिमा तिच्या डोळ्यापुढे आली.

"मेरी! माझ्या बाळासाठी मला आयुष्य दे" तिचं मन आक्रंदत होतं....

स्टेफनीला समजवण्यासाठी तिची सुपरवायझर पुन्हा टॉवेलरूममध्ये गेली. तिथे ती नव्हती हे लक्षात येताच तिने विकासला फोन केला. शेखा सलमांची हकीकत सांगितली.

"कोण आहेत शेखा सलमा?" विकासनं विचारलं.

"मुख्य राज्यकर्ते शेख झायेद यांच्या पत्नी शेखा फातिमा यांच्या त्या नातेवाईक आहेत. त्यांच्याबरोबर समाजकार्य करतात. मिटिंग्ज असल्या की या हॉटेलमध्ये मुक्काम करतात." सुपरवायझरने सांगितलं.

विकासच्या हातून फोन गळून पडला. खिन्न मनाने तो खिडकीजवळ आला. कॉर्निशकडे पाहताना त्याला मागचं सगळं आठवत होतं. कॉर्निशच्या कट्ट्याला टेकून उभ्या असणाऱ्या स्टेफनीच्या मनातलं वादळ त्याला इथून हेलावत होतं. आता फक्त आलिया भोगासी सादर व्हायचं!

अपेक्षेप्रमाणे दुसऱ्या दिवशी निरोप आला. शेखा सलमाने विकासला भेटायला बोलावलं. सगळा खेळ संपला होता. वधस्तंभाकडे जावं तसा तो शेखा सलमांना भेटायला हॉटेलच्या लॉबीत आला. लॉबीत एक मुलगा खेळत होता. नेहमीच्या सवयीनं विकासनं त्याला म्हटलं, "सलाम आलेकुम छोटे शेखसाहेब!"

"तुला आठवलं तर!" बुरख्यातली एक बाई म्हणाली तेव्हां विकासनं त्या मुलाकडे पाहिलं.

"हो! तो माझ्या नोकरीचा पहिला दिवस होता" तो म्हणाला व मनात म्हणाला, "आणि स्टेफनीच्या पहिल्या भेटीचाही! मी ती गोष्ट कशी विसरेन?"

"मी शेखा सलमा!" तिने आपली ओळख करून दिली अन् विकास एकदम ताठरला.

"सलाम आलेकुम" घाबरत घाबरत म्हणाला. विचारांच्या नादात अभिवादन करायचं राहिलं होतं.

"मला तुझी हकीकत इकडनं तिकडनं कळलीय. तुझ्याकडून पूर्ण तपशील हवा आहे." ती म्हणाली. विकासनं तिला सर्व हकीकत सांगितली.

"म्हणजे वर्षाला पाच हजार दिराम कमी पडताहेत?" ती.

"हो!"

"या देशात मुलींवर अत्याचार होऊ नये म्हणून शेख झायेद यांनी कडक कायदे केले आहेत व्यभिचारासाठी! ऐपत नसताना मुलींशी लग्न करून हाल करणं याविरुद्ध हा कायदा आहे. शेखा फातिमा खूप समाजकार्य करतात. शेखासाहिबांचं समाजकार्य.." ती बोलत होती. विकासचं तिकडे लक्ष नव्हतं. तो मनात म्हणत होता,

"मला काय करायचंय तुमच्या शेख आणि शेखाशी? आमची तर इकडे वाट लागली आहे!"

सलमानं एक पाकीट पुढे केलं. "हे कागद घेऊन उद्या कोर्टात हजर हो." ती म्हणाली.

जड मनाने त्याने ते पाकीट घेतलं. "मला मृत्यूदंडाचा फतवा असावा." सलाम करून तो तिथून निघाला. स्टेफनीला भेटायला गेला. तिच्या मनाची सर्व तयारी झाली होती. त्यानं ते पाकीट स्टेफनीकडे दिलं. तिनं ते उघडलं. त्यात अरेबिक मजकुराखाली त्याचं इंग्रजी भाषांतर होतं. ती निर्विकारपणे वाचू लागली.

"या पत्राद्वारे विकास विश्वंभर देसाई याला रोज दिवसातून ३ तास छोट्या शेखसाहेबांना सांभाळण्याचं काम देण्यात येत आहे. त्यासाठी त्याला वर्षाला पाच

हजार दिराम देण्यात येतील. कराराची मुदत शेख सलमा ठरवतील."

त्याचबरोबर हॉटेलच्या नोटपॅडवर हाताने लिहिलेली चिठ्ठी होती -

"Thank you for saving my son's life!"

– निलिमा कुलकर्णी

एकताच्या सौजन्याने ......

email - neelimakulkarni@yahoo.com.

nkulkar@us.ibm.com

************

(भिसे, कारखानीस कुटुंबीय आणि "मायबोलीचा विश्वसेतू" च्या सह-संपादकांच्या परवानगीने "मायबोलीचा विश्वसेतू" या पुस्तकातून)